नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 23/07/2021 (शुक्रवार)
(सायंकाळ)

---

## सावनेर येथील हातभट्टी दारू गाळणारा कुख्यात गुन्हेगार मिलींद धापोडकर हा MPDA कायदयान्वये नागपूर कारागृहात स्थानबध्द

पोलीस स्टेशन सावनेर नागपूर ग्रामीण हद्दीतील हातभट्टी दारू काढणारा व अवैध गावठी दारू विक्री करणारा इसम मिलींद हेमराज धापोडकर वय 36 वर्षे रा. बाजारचौक पाटनसावंगी यास मा. जिल्हादंडाधिकारी नागपूर यांचे आदेशाने MPDA कादयान्वये मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे 01 वर्षे कालावधी साठी दिनांक 22.07.2021 रोजी स्थानबध्द केले आहे.

स्थानबध्द नामे मिलीद हेमराज धापोडकर रा. पाटनसावंगी हा मागील 6 ते 7 वर्षा पासुन हातभट्टी लावून मोहाफुलाची गावठी दारू गाळुन गावात व आजुबाजुच्या परिसरात दारूची विक्री करत होता. तो एक सराईत हातभट्टीवाला असुन सन 2018 पासुन सतत हातभट्टी लावुन गावठी दारू निर्मीती व विक्री करीत होता. सावनेर पोलीसांनी त्याच्या अवैध अड्डयावर वारंवार रेड करून कायदेशीर कार्यवाही केली व गुन्हे दाखल केले आहे. तसेच वेळोवेळी त्याच्यावर प्रतिबंधक कार्यवाही केली तरी सुध्दा त्यांचेमध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा झाली नाही. त्यामुळे त्याच्यावर MPDA कायदयांतर्गत कार्यवाही करण्याबाबत ठाणेदार सावनेर यांनी पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांचेमार्फत जिल्हाधिकारी नागपूर यांना प्रस्ताव सादर केला.

मिलींद धापोडकर हा त्याच्या साथीदारासह वाहनाव्दारे दारूची वाहतुक करतो. तसेच वाहने वेगाने व निष्काळजीपणे चालवतो त्यामुळे रस्त्याने येणारे व जाणारे, परिसरातील आणि इतर लोकांच्या जीवीतास धोका निर्माण झालेला होता. सदर व्यक्तीचे या वर्तणामुळे त्यास अवैद्य पैसा मिळविण्याचे साधन निर्माण झाले असे वाटत असल्याने तो पाटनसावंगी गावामध्ये नियमित अवैद्यरित्या दारूची विक्री करीत होता. त्यामुळे ग्राम पाटनसावंगी ला लागून असलेल्या परिसरातील 4 ते 5 गावातील तरूण मुले, व्यक्ती दारूच्या आहारी जावुन व्यसनाधीन झालेले आहेत. तसेच व्यसनी व्यक्तीमुळे तरूण पिढीचे कुटुंबे व्यसनाधीन होवुन कुटुंबातील मुली, स्त्रियांना त्रास सहन करावा लागत आहे. व्यसनी ईसमांमुळे नागपूर ग्रामीण परिसरातील ता. सावनेर ग्राम पाटनसांवगी व परिसरातील स्त्रिया, मुलीचे छेडखानीचे प्रमाण वाढले असल्याने सार्वजनिक व्यवस्थेत बाधा उत्पन्न झाली आहे. सदरची परिस्थीती लक्षात घेता नागपूर ग्रामीण चे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला यांचे मार्गदर्शनाखाली मिलींद धापोडकर यांचे विरूध्द MPDA कायदयांतर्गत कार्यवाही करून मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे स्थानबध्द केले आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर, श्री. अशोक सरंभळकर उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार, पोलीस निरीक्षक मारूती मुळूक ठाणेदार सावनेर, सहा. पोलीस निरीक्षक निशांत फुलेकर, सहा. पोलीस निरीक्षक, राजीव कर्मलवार, जितेंद्र वैरागडे, पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र गौरखेडे, सहा. फौजदार बाबा केचे, पोलीस हवालदार चंद्रशेखर घडेकर, निलेश बर्वे, विजय डोंगरे, नायक पोलीस दिनेश आधापुरे, राजेंद्र रेवतकर, महिला नायक पोलीस नम्रता बघेल, रोशनी भोयर, पोलीस शिपाई भुपेश तभाने आणि चालक नायक पोलीस अमोल कुथे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर